ePaper

**तुळजाभवानी दर्शनाला गेलेली बस घाटात उलटली; मोशीतील महिला भाविकाचा मृत्यू!**




# महाईन्यूज™

वर्ष - 8 । अंक - 200 | UDYAM-MH-26-0158827

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 30 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**


- आक्रमक -बेफिकीर यात फरक आहे
- प्रत्येक चेंडूवर बाऊंड्री मारु शकत नाही!
- दक्षिण सुदानमध्ये भीषण विमान अपघात
- अस्वच्छ पाणी जाहीरत्या पिऊन दाखवा


## 30 जणांचा मृत्यू ; 60 जण जखमी

# महाकुंभ मेळ्यात चेंगराचेंगरी!

## अचनाक गर्दी वाढली : ब्रह्म मुहूर्तावर स्नान करण्यासाठी झुंबड

। प्रयागराज ।महाईन्यूज।

**उत्तर प्रदेशातील प्रयागराज या ठिकाणी कुंभमेळा सुरु आहे. मौनी अमावस्येच्या पर्वणीच्या रात्री एक अप्रिय घटना घडली. साधारण रात्री २ च्या सुमारास संगम नोज या ठिकाणी चेंगराचेंगरी झाली. या घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला, तर ६० जण जखमी झाले. महाकुंभचे डीआयची वैभव कृष्ण यांनी सांगितलं, की भाविक ब्रह्म मुहुर्ताची वाट बघत होते, ब्रह्म मुहुर्तावर स्नान करणं पवित्र मानलं जातं. अचानक काही भाविक दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर आले.**

काहीही कल्पना नसताना पाठीमागून भाविकांची गर्दी आल्याने हलकल्लोळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. २९ तारखेला या ठिकाणी कुणीही व्हिआयपी येणार नव्हते. आगामी दिवसांमध्ये येणाऱ्या पर्वण्यांनाही व्हिआयपी मुव्हमेंट नसणार आहे. आज मौनी अमावस्या आहे. त्यामुळे मुख्य स्नान पर्वणी आज आहे. अशातच बेला परिसरातल्या आखाड्यात गर्दीचा ओघ खूप वाढला. त्यामुळे अलिकडे उभे असलेल्या लोकांनी पुढे उडी मारण्यास सुरुवात केली. यामुळे ही चेंगराचेंगरी झाली. या घटनेत ३० मृत्यू झाले आहेत. ज्यापैकी २५ जणांची ओळख पटली आहे. तर ६० भाविक जखमी झाले आहेत. त्यांची माहिती मिळवण्यासाठी आम्ही १९२० हा हेल्पलाईन नंबरही जारी केला आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार या ठिकाणी अचानक गर्दी वाढल्याने चेंगराचेंगरीची घटना घडली. जे लोक स्नान करण्यासाठी आले होते त्यांना पहाटे ३ च्या दरम्यान स्नान करुन मौनी अमावस्येची पर्वणी साधायची होती. मात्र चेंगराचेंगरी झाली. या घटनेत जे लोक जखमी झाले त्यांना जवळच्याच रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. दर्शनासाठी, पवित्र स्नानासाठी भाविकांची गर्दी कमी होत नसल्याचे दिसत आहे. देश-विदेशातील नागरिकांसह भारतातूनही मोठ्या संख्येनं पर्यटक आणि भाविक प्रयागराज येथे उपस्थित आहेत. मौनी अमावस्येच्या ब्रम्ह मुहूर्तविळेस लोकांची मोठी गर्दी झाली होती. मेला परिसरात गर्दीच्या दबावामुळे आखाडा मार्गावरील अनेक बॅरिकेड्स तुटले. दुसरीकडे स्नानसाठी लोक बसलेले होते. यांना गर्दीने चिरडण्यास सुरूवात केली. यानंतर पोलिसांनी तातडीने बचावकार्य सुरू केले आणि ॲम्ब्युलन्सच्या मदतीने ९० जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुर्देवाने त्यातील ३० भक्तांचा मृत्यू झाला. तर काही जखमींना घरी पाठवण्यात आले. अद्याप ३६ जण दाखल आहेत. प्रयागराजमधील परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे पण गर्दीचा दबाव अजूनही खूप जास्त आहे. मी देखील संतांशी बोलल्यानंतर, त्यांनी मला नम्रपणे सांगितले आहे की भक्तांनी प्रथम स्नान करावे आणि नंतर मंदिरात जावे. ते गेल्यानंतरच आपण स्नानासाठी संगमाकडे जाऊ. सर्व आखाड्यांनी यावर सहमती दर्शविली. आहेत. लोकांना अफवांवर लक्ष देऊ नका असे आवाहन करण्यात आले आहे. संयमाने काम करा. हा कार्यक्रम लोकांसाठी आहे. प्रशासन त्यांच्या सेवेसाठी समर्पित आहे. सरकार सर्व प्रकारचे सहकार्य ताकदीने देण्यास तयार आहे. फक्त संगम नाक्यावरच येणे आवश्यक नाही. १५-२० किलोमीटरच्या परिघात तात्पुरते घाट बांधले आहेत, तुम्ही जिथे असाल तिथे आंघोळ करा. असे आवाहन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले आहे.



### पंतप्रधानांची योगी आदित्यनाथ यांच्याशी चर्चा



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यांनी महाकुंभातील परिस्थितीचा आढावा घेतला असून, आवश्यक त्या सूचना देखील केल्या आहेत. दरम्यान, अमित शाह यांनी योगी आदित्यनाथ यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वाशन दिले आहे. या घटनेवर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील भावना व्यक्त केल्या आहेत. तसेच ज्या भाविकांनी जीव गमावला आहे त्यांच्याबाबत शोक व्यक्त केला आहे. भाविकांना सुरक्षित स्नान मिळावे यासाठी सरकार राज्य युद्ध पातळीवर सतत काम करत आहे. पंतप्रधान मोदींनी सकाळपासून सुमारे ४ वेळा भाविकांची माहिती घेतली आहे.

### चेंगराचेंगरीचा इतिहास

**1954** स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच 1954 मध्ये प्रयागराजमध्ये कुंभमेळा आयोजित करण्यात आला होता. नवीन भारताच्या प्रशासकीय यंत्रणेला अशा घटनांची सवय नव्हती. या काळात सुमारे 800 लोक नदीत बुडून किंवा चिरडून मृत्युमुखी पडले. महाकुंभाच्या इतिहासातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा अपघात आहे.

**1986** मध्ये 200 लोकांचा बळी : 1986 मध्ये हरिद्वारमध्ये कुंभमेळा भरला होता. अहवालानुसार, 14 एप्रिल 1986 रोजी उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वीर बहादूर सिंह अनेक राज्यांच्या मुख्यमंत्री आणि खासदारांसह हरिद्वारला पोहोचले होते. यामुळे गर्दी नियंत्रणाबाहेर गेली आणि चेंगराचेंगरी झाली.

**2003** मध्ये 39 लोकांचा मृत्यू या काळात गर्दी व्यवस्थापनातही सुधारणा होत राहिली. पण 2003 मध्ये नाशिक कुंभमेळ्यात आणखी एक दुर्घटना घडली. हा अपघात अत्यंत दुःखद होता आणि त्यामुळे लाखो लोक उद्ध्वस्त झाले. या कुंभ अपघातात 100 जण जखमी झाले.

**2010** मध्ये सात जणांचा मृत्यू : यावेळी हरिद्वारमध्ये कुंभमेळा सुरू होता. साधू आणि भाविकांमध्ये झालेल्या संघर्षानंतर झालेल्या चेंगराचेंगरीत 7 जणांचा मृत्यू झाला आणि 15 जण जखमी झाले. या घटनेच्या प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, साधू आणि भक्तांमध्ये वाद झाला आणि त्यानंतर लोकांमध्ये चेंगराचेंगरी झाली.

**2013** मध्ये 42 जणांचा मृत्यू : नाशिक कुंभमेळ्याच्या 10 वर्षांनंतर, 2013 च्या प्रयागराज कुंभमेळ्यात आणखी एक दुर्घटना घडली अलाहाबाद रेल्वे स्थानकावरील पादचारी पुलावर रेलिंग कोसळल्याने चेंगराचेंगरी झाली. स्टेशनवरील प्रचंड गर्दी नियंत्रित करण्यासाठी रेल्वे पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. यामुळे चेंगराचेंगरी झाली.

# जीबीएसमुळे आणखी एक मृत्यू!

## ससून रुग्णालयात नोंद: राज्यातील रुग्णसंख्या 127 वर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या १२७ वर पोहोचली असून, आणखी एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. ससून सर्वोपचार रुग्णालयात ५६ वर्षीय महिलेचा जीबीएसने मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ सुरू झाल्यापासून राज्यातील हा दुसरा रुग्ण मृत्यू ठरला आहे.**




मंगला उमाजी चव्हाण (वय ५६) असे जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या सिंहगड रस्त्यावरील नांदोशी येथील रहिवासी होत्या. त्यांना १५ जानेवारीला अशक्तपणा आणि अर्धांगवायूची लक्षणे जाणवू लागली. त्यांना नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यांचा प्रकृती बिघडल्याने त्यांना १७ जानेवारीला ससून रुग्णालयात हलविण्यात आले. ससूनमध्ये उपचार सुरू असताना त्यांचा २८ जानेवारीला मृत्यू झाला. श्वसनक्रिया थांबण्यासह अर्धांगवायूमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे.राज्यात जीबीएसची रुग्णसंख्या आता १२७ झाली असून, त्यातील २० जण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यातील रुग्णांमध्ये २३ रुग्ण हे पुणे महापालिका क्षेत्रातील असून, ७३ रुग्ण हे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील आहेत. याचबरोबर पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील १३, पुणे ग्रामीणमधील ९ आणि इतर जिल्ह्यांतील ९ रुग्ण आहेत. राज्यातील एकूण रुग्णांपैकी ७२ रुग्णांचे जीबीएसचे निदान झालेले आहे, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे १२१ रुग्णांचे शौच नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यातील २१ नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस हा विषाणूसंसर्ग आणि ५ नमुन्यांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणूसंसर्ग आढळला आहे. याचबरोबर २५ रुग्णांचे सेरेब्रोस्पायनल फ्लुईडचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यात एका नमुन्यांमध्ये इपस्टीन बार विषाणूसंसर्ग आढळला आहे. तसेच, २०० रुग्णांच्या रक्त नमुन्यांमध्ये झिका, डेंग्यू आणि चिकुनगुन्या संसर्ग आढळून आलेला नाही, असे आरोग्य विभागाने नमूद केले आहे. राज्यात गुइनेल बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. याची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. महाराष्ट्रातील आरोग्याची ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे.

### जीवाणूसह विषाणूसंसर्ग

महापालिका क्षेत्रातील असून, ७३ रुग्ण हे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील आहेत. याचबरोबर पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील १३, पुणे ग्रामीणमधील ९ आणि इतर जिल्ह्यांतील ९ रुग्ण आहेतआरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे १२१ रुग्णांचे शौच नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.

# पुण कोंडी फोडण्यासाठी आयुक्त रस्त्यावर

## अतिक्रमणांवर 'सर्जिकल स्ट्राईक'चे अमितेश कुमारचे आदेश

। पुणे । महाईन्यूज

**नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची पाहणी करण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार मंगळवारी स्वत: रस्त्यावर उतरले. वाघोली परिसरातील कोंडी, सिग्नल व्यवस्था, कोंडीची ठिकाणांची पाहणी करण्यासाठी पोलीस आयुक्त अधिकाऱ्यांबरोबर दीड किलोमीटर चालत गेले.**




वाघोली पुण्याचे प्रवेशद्वार आहे. या भागातून जाणाऱ्या नागरिकांना कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याने पोलीस आयुक्तांनी खराडी जकात नाका ते पेरणे फाट्यापर्यंतच्या अतिक्रमणांवर कारवाई (सर्जिकल स्ट्राईक) करा, आदेश त्यांनी दिले. या भागातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्र येऊन काम करावे, तसेच १० फेब्रुवारीपर्यंत या भागातील वाहतूक समस्या सोडवावी, अशी सूचना त्यांनी दिल्या.नगर रस्त्यावरून पुण्याकडे येणारे वाहनचालक वाघोलीमार्गे शहरात येतात. वाघोली ते खराडी हे अंतर दहा मिनिटांत कापता येते. मात्र, वाहनांची संख्या, अवजड वाहने, अतिक्रमणांमुळे दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी किमान अर्धा ते पाऊण तास वेळ लागतो. याबाबत वाहनचालक, रहिवाशांनी तक्रारी केल्या होत्या. शिरूर मतदार संघातील आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती. त्यानंतर मंगळवारी सकाळी आयुक्त नगर रस्त्यावर आले. खराडी जकात नाका ते पेरणे फाटादरम्यान पाहणी केली. आमदार कटके, तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्यासह अधिकारी या वेळी उपस्थित होते. नागरिकांच्या सूचनांची दखल घेऊन नगर रस्ता कोंडीमुक्त करुन वाहतूक गतिमान करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असे आमदार कटके यांनी सांगितले. वाघोली भागातील रहिवासी रामदास दाभाडे, नवीन नायडू, अनिल सातव, समीर भाडळे, संपत गाडे, चंद्रकांत वारघडे या वेळी उपस्थित होते.वाघोली भागातील पानपट्ट्यांवर अमली पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी केला. पानपट्ट्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पानपट्टीच्या नावावर अमली पदार्थांची विक्री होत असेल, तर कडक करवाई करावी, असे आदेश दिले.नगर रस्त्यावर भरधाव डंपरमुळे गंभीर स्वरुपाचे अपघात घडतात. डंपर चालक आणि मालकांनी याबाबत उपाययोजना कराव्यात. डंपरचालक प्रशिक्षित असायला हवा. चालकाला मद्यपानाची व्यसन आहे का नाही, याची खात्री डंपरमालकांनी करावी. अपघात झाल्यास चालकाचा वाहन परवाना रद्द करण्यात यावा. खडी वाहतूक करणारे डंपर कापडाने झाकायला हवेत. त्यामुळे धूळही उडणार नाही, अशा सूचना पोलीस आयुक्तांनी दिल्या आहेत. वाघोली ते खराडी हे अंतर दहा मिनिटांत कापता येते. मात्र, वाहनांची संख्या, अवजड वाहने, अतिक्रमणांमुळे दहा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी किमान अर्धा ते पाऊण तास वेळ लागतो. याबाबत वाहनचालक, रहिवाशांनी तक्रारी केल्या होत्या. शिरूर मतदार संघातील आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती.

### पानपट्ट्यांवर कारवाईचे आदेश

अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्यासह अधिकारी या वेळी उपस्थित होते. नागरिकांच्या सूचनांची दखल घेऊन नगर रस्ता कोंडीमुक्त करुन वाहतूक गतिमान करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असे आमदार कटके यांनी सांगितले. वाघोली भागातील रहिवासी रामदास दाभाडे, नवीन नायडू, अनिल सातव, समीर भाडळे, संपत गाडे, चंद्रकांत वारघडे या वेळी उपस्थित होते.वाघोली भागातील पानपट्ट्यांवर अमली पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी केला.

## धक्कादायक: पिंपरी-चिंचवडमध्ये

# एकाच दिवशी सहा आत्महत्या!

### वाढत्या आत्महत्येच्या घटनांमुळे चिंता: गळफास घेऊन जीवन संपवले

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकाच दिवशी सहा आत्महत्यांच्या घटनांची नोंद झाली आहे. शहरातील वाढत्या आत्महत्येच्या घटनांमुळे चिंता व्यक्त होत आहे. चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी (दि. २७) सकाळी साडेदहाच्या सुमारास गौरव ज्ञानेश्वर अगम (वय २८) या तरुणाने खिडकीतून भिंतीला आलेल्या लोखंडी ब्रॅकेटला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.**




आत्महत्येच्या दुसऱ्या घटनेत प्रसाद संजय अवचट (वय ३१, रा. पुनावळे) या तरुणाने सोमवारी (दि. २७) दुपारी साडेचारच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. आत्महत्येमागील कारण समजू शकले नाही.आत्महत्येच्या तिसऱ्या घटनेत विकास रामदास मुरगुंड (वय ३५, रा. गणपत लांडगे चाळ, भोसरी) या व्यक्तीने राहत्या घरात साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही घटना सोमवारी (दि. २७) दुपारी बाराच्या सुमारास उघडकीस आली. आत्महत्येच्या चौथ्या घटनेत मनाप्पा सोमल्या चव्हाण (वय ५२, रा.शिंदेवस्ती, नेरे, ता. मुळशी) यांनी घराशेजारील लिंबाच्या झाडाला डोक्याच्या पटक्याने गळफास घेतला. ही घटना सोमवारी (दि. २७) सकाळी पावणेदहाच्या सुमारास घडली. आत्महत्येच्या पाचव्या घटनेत नवनाथ भगवान पवार (वय ४६, रा. पवार चाळ, दत्तनगर, थेरगाव) यांनी राहत्या घराच्या शयनगृहात बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेतला. ही घटना सोमवारी (दि. २७) मध्यरात्री पावणे एकच्या सुमारास उघडकीस आली. मात्र, मृत्यूचे नेमके कारण समजू न शकल्याने त्यांचा व्हिसेरा प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आला आहे. आत्महत्येच्या सहाव्या घटनेत सुवर्णा श्रीराम पवार (वय ३६, रा. समीरा हाईटस्, ढोरेनगर, जुनी सांगवी) या महिलेने राहत्या घराच्या छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी (दि. २७) रात्री बाराच्या सुमारास उघडकीस आली. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

#### वाढत्या आत्महत्यांमुळे चिंता...

वाढता ताणतणाव, मानसिक आजारपण याव्यतिरिक्त कर्जबाजारीपणा, कौटुंबिक वाद अशा वेगवेगळ्या कारणांमुळे शहरी आणि निमशहरी भागामध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याने सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे.

---

## महापालिकास्तरावर होणार लोकशाही दिन..!

### PCMC : आता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन

**। पिंपरी ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय व तत्परतेने सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन शासनस्तरावर राबविण्यात येतो.**

लोकाभिमुख गतिमान प्रशासनाच्या दृष्टिने या उपक्रमाचे प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी तसेच महापालिका प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद वाढीसाठी आता महापालिकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. याबाबतचे परिपत्रक महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या स्वाक्षरीने सामान्य प्रशासन विभागाला निर्गमित केले आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जाणारा हा लोकशाही दिन अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राबवला जाणार आहे. महापालिका अतिरिक्त आयुक्त (१) यांच्याकडे फेब्रुवारी, मे, ऑगस्ट आणि नोव्हेंबर अशा चार महिन्यांचा कालखंड सोपवण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त (२) यांच्याकडे मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबर यांच्या चार महिन्यांची जबाबदारी असेल. तर, अतिरिक्त आयुक्त (३) यांच्याकडे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी अशा चार महिन्यांचे अध्यक्षपद असेल. नागरी सुविधा केंद्राचे विभागप्रमुख हे लोकशाही दिनाचे समन्वय अधिकारी म्हणून कामकाज पाहतील. प्रशासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक तरतुदींचा अंतर्भाव करायचा असल्यास अथवा निर्णय घ्यायचे असल्यास त्याकरीता समन्वय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. लोकशाही दिनाची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देणे, प्राप्त निवेदनावरील कार्यवाहीचे विविधस्तरावरील संनियंत्रण करण्यासाठी समन्वय अधिकाऱ्यांमार्फत आज्ञावली विकसीत केली जाणार आहे. समन्वय अधिकाऱ्यांमार्फत लोकशाही दिनाकरीताचे विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच विहित नमुन्यातील अर्ज नागरी सुविधा केंद्राच्या बाहेर लावण्यात येतील. समन्वय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक महिन्याला कार्यक्रमाचे स्थळ आणि वेळ निश्चित करून त्याबाबत नागरिकांना विविध माध्यमांद्वारे अवगत केले जाणार आहे. लोकशाही दिनासाठी दाखल करावयाच्या अर्जाच्या विहित नमुन्यातील प्रती नागरिकांना सहजतेने विनामूल्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी समन्वय अधिकाऱ्यांची असेल.




#### लोकशाही दिन केव्हा होणार नाही?

निवडणूक कालावधीत आचारसंहिता लागू असताना लोकशाही दिनाचे आयोजन केले जाणार नाही. लोकशाही दिनातील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची पोचपावती विहित नमुन्यात देण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज स्वीकृत केल्यानंतर ज्या विभागाशी संबंधित तक्रार आहे, त्या विभागाच्या प्रमुखांकडे संबंधित अर्ज पाठविण्यात येईल. सदर विभागप्रमुख अर्जातील विनंतीबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह लोकशाही दिनी हजर राहतील. सदर अहवाल, अर्जदाराची विनंती, त्याबद्दलचे नियम, महापालिकेची भूमिका, तरतुदी याबाबींचा विचार करून लोकशाही दिन प्रमुख योग्य निर्णय देतील.

# घटनात्मक नैतिकता म्हणजे नेमके काय?

**राज्यघटना लिखित तसेच अलिखित असू शकते तरीदेखील तेथील दोन ओळींच्या तरतुदीत मधील बरेच वाचावे लागते. त्यातच राज्यघटनेचे खरे तत्वज्ञान असते. प्रेरणा आणि अस्मिता यांची अभिव्यक्ति असते आणि ती सार्वजनिक जीवनात प्रत्येकाने अंगिकारून आचरण करणे म्हणजे घटनात्मक नैतिकता होय.**








भूमिका

राज्य घटनेने योजलेले शब्द हे आशयप्रधान असतात. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेली राज्यघटनेची सारभूत संरचना ही मूल्यात्मक आहे. ती अंतिम नाही. भारत देशात जेथे मुळातच स्वातंत्र, समता आणि बंधुत्वाचा अभाव होता तेथे घटनात्मक नैतिकताच काय लोकशाही देखील बाह्य स्वरूपाची आहे. त्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की भारतीय समाजाला घटनात्मक नैतिकतेची जोपासना करावी लागेल. घटनात्मक नैतिकता हा शब्द आपल्या राज्यघटनेत स्पष्टपणे वापरला जात नसला तरी या संकल्पनेचा उल्लेख चार कलमांमध्ये म्हणजे कलम १९(२) मध्ये दोन वेळा आणि २५ , २६ मध्ये प्रत्येकी एक वेळा, विशेषतः स्वैराचाराच्या मानसिकतेचा अर्थ लावण्यासाठी आणि त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी करण्यात आला आहे. राज्य घटना सतत उत्क्रांत होत असते. कधी राजकीय परिस्थितीनुसार तर कधी नव्या प्रस्थापित होणाऱ्या पायंड्यांमार्फत; नव्या संकेतानुसार तर कधी औपचारिक घटना दुरुस्तीतून आणि तसेच न्यायालयाने दिलेल्या निर्णयांमार्फत, त्यामुळे घटनेची नैतिकता देखील बदलत असते. आजचे राजकीय नेतृत्व जास्त धार्मिक आणि व्यावसायिक झालेले आहे. पहिल्या दशकात असलेली राष्ट्रीय सहमती आज अस्तित्वात राहिलेली नाही. धार्मिक मुलतत्ववाद वाढला आहे, अल्पसंख्यांकांना अ-सुरक्षतेची भावना मोठ्या प्रमाणात त्रस्त करत आहे. निधर्मीयतेसारख्या तत्त्वाची पायमल्ली होत आहे. असा आक्षेप घेतला जातो की मर्यादित मतदारांनी निवडलेल्या घटना समितीला पहिली घटना दुरुस्ती करण्याचा अमर्यादित अधिकार होता तर प्रौढ मतदान पद्धतीने निवडून आलेल्या संसदेला तो का नसावा? बाबासाहेब आंबेडकरांनी या आक्षेपाला एका भाषणात उत्तर दिले की 'घटना समितीला कुठलेही पूर्वग्रह नव्हते, राज्य घटनेच्या तरतुदी तयार करतांना त्यांचे कोणतेही हितसंबंध नव्हते' आणि त्यांनी असाही इशारा दिला होता की 'भविष्यकाळात संसदेचे सभासद तिच्याकडे पक्षीय भूमिकेतून बघतील, पक्षीय हित हेच त्यांच्या मतदानामागची प्रेरणा असेल, तशी घटना समितीच्या सभासदांवर पक्षीय तत्त्व प्रणाली हावी नव्हती. ते फक्त देशाला चांगली राज्यघटना देण्याच्या हेतूने प्रेरित झाले होते'. येथे बाबासाहेब त्यांचे समकालीन अमेरिकन राजकीय तत्वज्ञ जॉन रॉल यांच्या "निष्पक्षता हाच न्याय" (जस्टिस अँज फेअररनेस) हा सिद्धांत समजून घेतल्यास वरील भाष्य समजण्यास मदत होईल, यानुसार समान मूलभूत स्वातंत्र्य, संधीची समानता आणि असमानता उत्पन्न होऊ शकतील अश्या कोणत्याही परिस्थितीत समाजातील कमीत कमी फायदा असलेल्या सदस्यांना जास्तीत जास्त लाभ देणे म्हणजे सामाजिक न्याय होय. सामाजिक न्यायाच्या या तत्त्वांसाठी रॉलचा युक्तिवाद 'मुलभूत स्थिती' (ओरिजिनल पोजिशन) आणि अज्ञानाचा बुरखा (इगनोरन्स ऑफ व्हेल) हा विचारप्रयोग वापरतो ज्यामध्ये लोक जाणून बुजून प्रतिनिधीला निवडतात की ते कोणत्या प्रकारच्या समाजात राहायचे आणि ते त्यांना वैयक्तिकरित्या कोणते सामाजिक स्थान असेल जे मुळात त्यांना माहीतच नसते, त्यासाठी उदारमतवादी लोकशाही अंगिकारण्यास घटना समितीस प्राधान्य द्यावे लागले. म्हणून भविष्यकाळात घटना दुरुस्ती करतांना राजकीय पक्षांना राज्य घटनेची नैतिकता पाळणे आवश्यक असते.मूलतः लोकशाहीवादी नसलेल्या भारतीयांना राज्यघटनेच्या नैतिकतेची रुजवणूक करणे अत्यावश्यक आहे. यास्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात तीन बाबी भारतीयांना आत्मसात करण्यास आवश्यक असल्याचे सांगितले आहे. पहिली बाब म्हणजे आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण घटनात्मक मार्गांची कास धरली पाहिजे.

## प्रासंगिक »

### युजीसी...

***अनुसूचित जमातींना वगळणाऱ्या, लागू नसणाऱ्या आणि फक्त उत्तराखंडापुरत्याच 'समान नागरी कायद्या'ला अनेक भगदाडे आहेत...***

समान नागरी कायदा या संकल्पनेत काही वाईट नाही. उत्तराखंड या भाजपशासित राज्याने तो अमलात आणला आणि असा समान कायदा आणणारे ते दुसरे राज्य ठरले. पहिले गोवा. पण गोमंतकातील समान नागरी कायद्यात आपल्या कोणत्याही राजकीय पक्षाचा हात नाही. ती पोर्तुगीजांची देणगी. त्या राज्यातील समान नागरी कायद्याबाबत आपले कौतुक करायचेच असेल तर ते पोर्तुगीज गेल्यानंतरही आपण हा कायदा राहू दिला इतपतच करावे लागेल. आता त्यानंतर देवभूमी उत्तराखंडात असा समान नागरी कायदा लागू होईल. वास्तविक सध्याही देशात सर्व नागरिकांस समान फौजदारी दंड संहिता लागू आहे. म्हणजे एखादा गुन्हा हा हिंदू व्यक्तिने केलेला असो वा मुसलमान वा अन्य कोणी. त्याचा खटला धर्मविरहित भावनेने चालवला जातो आणि गुन्हेगार कोणत्या धर्माचा आहे हे पाहून शासन केले जात नाही.

आशियातल्या, आपल्या आसपासच्या काही देशांत आजही स्वेच्छेने ठेवलेले समलिंगी संबंध हा फौजदारी गुन्हा माला जातो. पण या असल्या देशांशी आपण आपल्या 'जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही'ची तुलना करण्यात समाधान मानायचे का, हा खरा प्रश्न आहे.

# विवाह-कायद्यांबाबत आजचा भारत बुरसटलेलाच



एकीकडे उत्तराखंडसारख्या लहान राज्यात 'समान नागरी कायदा' आणण्याच्या मिषाने 'लिव्ह इन'चीही नोंदणी सक्तीची झालेली असताना, एकमेकांना जन्माचे जोडीदार मानून विवाह-नोंदणी करायला उत्सुक असलेल्या समलिंगी जोडप्यांना मात्र विवाहाचा हक्क नाही. सर्वोच्च न्यायालयाने २०२३ मध्येच हा हक्क नाकारला आहे आणि त्या निकालाचा फेरविचार करावा, अशी याचिकासुद्धा २०२५ मध्ये (९ जानेवारी रोजी) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळलेली आहे. कारण काय तर, आधीच्या निकालातच सर्वोच्च न्यायालयाने "समलिंगी विवाहांना मुभा देणारा कायदा संसदेने संमत करून अमलात आणावा" असे म्हटले होते.या बाबतीत मात्र आपण मागेच राहिलो. अनेक आशियाई देशांमध्ये आज समलिंगी विवाह कायदेशीर मानले जातात. थायलंड हासुद्धा आपल्याप्रमाणेच परंपरांचा अभिमान असणारा देश, पण तिथल्या लोकप्रतिनिधी-गृहानेसुद्धा मार्च २०२४ मध्ये प्रचंड बहुमताने (बाजूने ४०० मते, विरोधात फक्त १०) समलिंगी विवाह विधेयक संमत केले. थायलंडच्या वरिष्ठ सभागृहात म्हणजे सिनेटमध्ये हेच विधेयक १३० विरुद्ध ४ अशा बहुमताने जून महिन्यात मंजूर झाले आणि मग ऑगस्ट २०२४ मध्ये थायलंडचे राजे वज्रालंकोरन यांच्या मान्यतेची मोहोर त्यावर उमटून ते अमलातही आले. त्याहीआधी, किंबहुना अख्ख्या आशिया खंडात समलिंगी विवाहांना कायदेशीर ठरवणारा पहिला देश म्हणजे तैवान. समान हक्कांच्या न्यायतत्त्वाआधारे त्या देशातील समलिंगींनाही कायदेशीरपणे आपल्या पसंतीचा समलिंगी जोडीदार निवडण्याचा हक्क आहे, असा निकाल दिला. यावर गदारोळ उठला, 'सार्वमत' घेऊन विरोधातील मताधिक्याच्या बळावर या हक्काची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न झाला, पण तैवानी पार्लमेण्टने धडाडी दाखवून २०१९ मध्ये समलैंगिकांना विवाहाचा हक्क देणारा कायदा संमत केला. भारतात हिंदू पद्धतीने- सात फेरे घेऊन- एकमेकींशी विवाह करण्याचे धाडस १९८७ सालात महिला पोलीस लीला नामदेव आणि तिची मैत्रीण ऊर्मिला श्रीवास्तव यांनी दाखवले होते. तेव्हाच्या 'दूरदर्शन'सह बहुतेक वृत्तपत्रांनी या विवाहाला सचित्र प्रसिद्धीही दिली होती. त्या वेळी तर एकंदर जगभरातच समलिंगी विवाहांचा हक्क, कायदेशीरपणा यांची चर्चा पुरेशी सुरूही झालेली नव्हती. ऑक्टोबर २००५ मध्ये मी लिहिलेले हे पुस्तक प्रकाशित झाले. याद्दष्टीने अभ्यास करण्यासाठी मी प्रेरित झाले तीच मुळी लीला नामदेव आणि ऊर्मिला श्रीवास्तव या दोघींच्या विवाहामुळे. मग १९८० आणि ९० च्या दशकांमध्ये कित्येक समलिंगी जोडप्यांनी अशा प्रकारे- धार्मिक विधी करून- विवाह केलेले आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# धनंजय मुंडे फडणवीस-पवारांचे खास

## क्षीरसागरांच्या दाव्यावर पंकजा मुंडेंचं दोन वाक्यात उत्तर

**। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**बीडमधील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी १० हून अधिक आरोपींना ताब्यात घेतलं आहे. मात्र, अद्याप कोणावरही कठोर कारवाई झालेली नाही. सध्या सीआयडी, विशेष चौकशी पथक आणि न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी चालू आहे. अद्याप या चौकशीत कोणाच्या सहभागाबाबत ठोस निष्कर्ष समोर आलेला नाही. दरम्यान, या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मिक कराडला पोलिसांनी ताब्यात घेतलं नाही.**



मात्र, विरोधी पक्षांमधील आमदारांनी वाल्मिक कराडप्रमाणेच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरही वेगवेगळे आरोप केले आहेत. विरोधी पक्षांमधील नेते मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. मात्र, "कोणी मागणी केली म्हणून लगेचच राजीनामा घेतला जाणार नाही. पुरावे असल्याशिवाय कारवाई केली जाणार नाही", असं सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी पुन्हा एकदा फेटाळून लावली. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय म्हणून ओळखला जातो. मुंडे यांच्या पाठिंब्याच्या जोरावरच वाल्मिकने संपूर्ण बीड जिल्ह्यात दहशत पसरवली असल्याचा आरोप विरोधक सातत्याने करत आहेत. सत्ताधारी भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी देखील हाच आरोप केला आहे. दुसऱ्या बाजूला, उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) प्रमुख अजित पवारांनी आतापर्यंत अनेक वेळा मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी फेटाळून लावली आहे. मंगळवारी त्याची पुनरावृत्ती पाहायला मिळाली.

यावर बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी नाराजी व्यक्त करत एक्सवर एक पोस्ट केली आहे. संदीप क्षीरसागर यांनी एक्सवर म्हटलं आहे की "वाल्मिक कराड जसा धनंजय मुंडेंचा खास आहे, तसे धनंजय मुंडे हे देवेंद्र फडणवीस व अजित पवारांचे खास आहेत. त्यामुळे राजीनामा अशक्य आहे.

अंजली दमानिया यांनी कितीही पुरावे दिले तरी राजीनामा अशक्य आहे". दरम्यान, क्षीरसागर यांच्या या पोस्टवर दमानिया यांनी देखील प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, "आता अगदी स्पष्ट झाले आहे. यांना मित्राला वाचवायचे आहे. त्या मित्राने जनतेला चिरडले तरी चालेल".

दरम्यान, यावर आता पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पंकजा मुंडे यांची मुंबईत काही वेळापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवारांबरोबर महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठीकनंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली.

### मी यावर काय बोलू?

यावेळी वार्ताहरांनी त्यांना धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी आणि संदीप क्षीरसागर यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता त्या म्हणाल्या, "मी हे काहीच पाहत नाही. मी फक्त तुम्हा प्रसारमाध्यमांचं ऐकून घेते. मी यावर काय बोलू?"संतोष देशमुख हत्या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली आहे. देशमुख यांची हत्या होऊन आता ५१ दिवस झाले आहेत. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांच्याकडे पुरावे सादर केले असल्याचा दावा केला होता. तसेच आज धनंजय मुंडे दिल्ली दौऱ्यावर गेले असल्यामुळे ते राजीनामा देतील, अशी जोरदार चर्चा होती. यावर आता धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.दिल्ली येथे पत्रकारांशी बोलत असताना धनंजय मुंडे राजीनाम्याच्या प्रश्नावर म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मी दोषी वाटत असेल तर त्यांनी माझा राजीनामा मागावा. मी राजीनामा देण्यास तयार आहे. मी दोषी आहे की नाही, हे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सांगू शकतील.

### मी नैतिकदृष्ट्या दोषी नाही : मुंडे

५१ दिवसांपासून मला लक्ष्य केले जात आहे." नैतिकतेच्या मुद्यावर स्वतःहून राजीनामा देणार का? असा प्रश्नही यावेळी मुंडे यांना विचारण्यात आला. त्यावर मुंडे म्हणाले, "माझी नैतिकता माझ्या लोकांबाबत प्रामाणिक आहे. मी जे बोलतो, ते अतिशय प्रामाणिकपणे बोलतो. मी नैतिकदृष्ट्या दोषी नाही, असे मला वाटते. जर दोषी असेल तर माझे वरिष्ठ मला तसे सांगतील."नैतिकतेच्या मुद्यावर धनंजय मुंडे राजीनामा देत नाहीत, यावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार टीका केली. त्या म्हणाल्या, "आमच्या सरकारच्या काळात अनिल देशमुख, संजय राऊत, नवाब मलिक, छगन भुजबळ यांना केवळ ऐकीव माहितीवर अटक केली होती. वर्ष-वर्ष ते तुरुंगात होते. आतातर सत्तेत असलेले आमदारही टीव्हीवर रोज पुरावे देत असतानाही राजीनामा दिला जात नाही. माझ्यामुळे जर ५० दिवस पक्षाची रोज बदनामी होत असती तर मी स्वतःहून राजीनामा दिला असता. मी पक्षाला अडचणीत आणणारी भूमिका घेतली नसती. दरम्यान बीड विधानसभेचे आमदार आणि एकेकाळचे धनंजय मुंडे सहकारी संदीप क्षीरसागर यांनी दावा केला.

---

# आरोपी आणि एपीआयचं चहाचं बिल मीच दिलं!

## मनोज जरांगेंच्या उपोषणाला धनंजय देशमुख यांचा पाठिंबा

**। बीड ।महाईन्यूज ।**

**बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या प्रकरणाचे पडसाद अद्यापही उमटत आहेत. यातला आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. तो सोडून इतर सगळ्यांना अटक करण्यात आली आहे. तर अवादा कंपनीच्या खंडणी प्रकरणात वाल्मिक कराडला अटक झाली आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी एक सीसीटीव्ही फुटेज समोर आलं होतं. ज्यामध्ये धनंजय देशमुखही दिसत होते.**



मनोज जरांगे यांच्या उपोषणाला धनंजय देशमुख यांनी एक दिवस उपोषण करत पाठिंबा दिला .संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेला ५० दिवस उलटले असून कुटुंबाच्या वेदना अजून कायम असल्याचं ते म्हणाले. पोलीस आपले तपासकाम मार्गी लावत असून तपास यंत्रणेवर त्यांनी समाधान व्यक्त केलं आहे. अजूनही कुटुंबाच्या वेदना तेवढ्याच कायम आहेत. आरोपींना अटक होत आहे त्यामुळे तपासात आशेचा किरण आहे. तपास यंत्रणेचे रोज एक एक काम सुरू आहे. तपास ज्या दिवशी पूर्ण होईल त्या दिवशीच मी व्यक्त होईल असंही धनंजय देशमुख म्हणाले. कुटुंब आणि गावाला भीती कायम आहे कारण आरोपी हे सराईत गुन्हेगार आहेत. पण सरकार गंभीर आहे फाशी दिल्याशिवाय थांबणार नाही, असंही धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणात एकीकडे वाल्मिक कराडला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे .कृष्णा आंधळेला वॉरंट घोषित करण्यात आलं आहे. या संपूर्ण प्रकरणानंतर दररोज नवनवे पुरावे तपास यंत्रणांना सापडत असून काही दिवसांपूर्वी सापडलेल्या सीसीटीव्हीवर धनंजय देशमुख बोलले आहेत. धनंजय देशमुख म्हणाले, "केजमध्ये एक ठिकाण आहे तिथे सगळेच जण भेटतात. त्याच ठिकाणी मी माझ्या मित्रांसोबत चहापानासाठी बसलो होतो.

### आरोपींनी त्यांचे टार्गेट पूर्ण केले

त्या ठिकाणी आरोपी आणि एपीआय आले. मला त्यांनी बोलवून घेतलं. माझी आणि आरोपीची चर्चा त्या ठिकाणी झाली नाही. चहा पिऊन झाल्यावर त्यांचं बिल मी दिलं. मला कल्पना असती तर मी पोलिसांकडे गेलो असतो. आरोपींनी त्यांचे टार्गेट पूर्ण केले. आपण मात्र चांगुलपणा केला होता. पण आरोपींनी घात केला.माझ्याकडे आलेल्या लोकांसाठी अतिथी देवो भवचा बोर्ड लावला आहे. आपलं काम आहे या भावनेतून मी साहेबांसाठी बिल दिलं. असं धनंजय देशमुख म्हणाले आहेत. एबीपी माझाशी त्यांनी संवाद साधला त्यावेळी हा खुलासा केला आहे.हत्येच्या घटनेला ५० दिवस उलटले असून कुटुंबाच्या वेदना अजून कायम असल्याचं ते म्हणाले.

# अस्वच्छ पाणी जाहीररित्या पिऊन दाखवा

## केजरीवालांचे अमित शाह, राहुल गांधींना आव्हान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसचे नेते, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यमुनेचे पाणी जाहीररित्या पिऊन दाखवा, असे आव्हान दिले आहे. शेजारच्या हरियाणा राज्यात यमुनेच्या पाण्यात विष कालवले जात असल्याचा आरोप केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे आव्हान दिले. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आता अवघा एक आठवडा उरला आहे. या पार्श्वभूमीवर इंडिया टुडे या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये केजरीवाल यांनी सांगितले की, दिल्लीतील यमुनेच्या पाण्यातील अमोनियाची पातळी वाढली असून ती ७ पार्ट्स प्रति मिलियन (PPM) एवढ्या धोकादायक पातळीवर पोहोचली आहे.**



दिल्ली विधानसभेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. प्रचाराचे केवळ पाच दिवस बाकी आहेत. दरम्यान, दिल्लीत सत्ताधारी व विरोधकांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. अलीकडेच दिल्लीचे माजी मुख्यमंत्री तथा आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी आरोप केला होता की हरियाणात भाजपाचे लोक यमुना नदीच्या पाण्यात विष मिसळत आहेत आणि तेच पाणी दिल्लीत पाठवलं जात आहे. केजरीवाल यांच्या या वक्तव्यानंतर भाजपाचे दिल्लीतले व देश पातळीवरील नेते आप प्रमुखांवर तुटून पडले. दरम्यान, आता खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केजरीवालांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "मला व दिल्लीत राहणाऱ्या सर्व न्यायाधीशांना मारण्यासाठी आपले हरियाणातील बांधव यमुनेच्या पाण्यात विष मिसळतील का?" दिल्लीच्या उस्मानपूर भागात भाजपाच्या एका प्रचारसभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी हरियाणातील लोकांवर गंभीर आरोप केले आहेत. विधानसभा निवडणुकीतील पराभवाच्या भितीने ते बिथरले आहेत. मला विचारायचं आहे की हरियाणाचे लोक त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या पाण्यात विष मिसळतील का? मोदी व देशातील सर्व न्यायाधीश, जगभरातील विविध देशांच्या दूतावासातील अधिकारी तेच पाणी पितात. हरियाणातील लोक मोदी व न्यायाधीशांना मारण्यासाठी त्यांच्या पाण्यात विषय मिसळतायत असं केजरीवाल म्हणत आहेत. मुळात असा विचार तरी कोणी करू शकतं का?"अरविंद केजरीवाल पुढे म्हणाले की, ७ पीपीएम अमोनिया हे 'विष'समान आहे. शेजारच्या हरियाणा राज्यातील भाजपा सरकार यमुना नदीला प्रदूषित करत आहे. ज्यामुळे दिल्लीतील जनतेचे आयुष्य धोक्यात आले आहे. मुख्यमंत्री आतिशी आणि मंत्री सौरभ भारद्वाज यांनी अरविंद केजरीवाल यांच्या दाव्याला दुजोरा दिला तसेच विरोधकांना यमुनेचे पाणी पिण्याचे आव्हान दिले.अरविंद केजरीवाल यांनी म्हटले की, अमित शाह, राजीव कुमार, राहुल गांधी, संदीप दीक्षित यांना माझे आव्हान आहे की, तुम्ही माध्यमांसमोर ७ पीपीएम अमोनिया असलेले पाणी पिऊन दाखवा. तुम्हीच दिल्लीत ७ पीपीएमचे पाणी पाठवत असून उलट माझ्यावरच मी खोटे बोलत असल्याचा आरोप करत आहात. यावर केजरीवाल यांना त्यांच्या दाव्याबाबत पुरावा मागण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, मग यमुनेच्या प्रदूषणासाठी जबाबदार कोण आहे? कारण पाणी तर पानीपतमधून येत आहे.अरविंद केजरीवाल यांनी निवडणुकीच्या जाहीर सभेमध्ये हरियाणा सरकारवर आरोप केले. त्यानंतर भाजपाने यावर प्रत्युत्तर तर दिले आहेच. त्याशिवाय हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर खटला चालविण्याची धमकी दिली आहे. तसेच केजरीवाल यांनी माफी मागावी, असेही ते म्हणाले.भाजपाप्रमाणेच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीही अरविंद केजरीवाल यांच्यावर निशाणा साधला आहे.

### नरेंद्र मोदी नेमकं काय म्हणाले?

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच केजरीवालदेखील खोटे बोलतात. पाच वर्षांपूर्वी केजरीवाल यांनी म्हटले होते की, यमुना नदीत ते आंघोळ करतील आणि यमुनेचे पाणी पिणार. पाच वर्ष झाले आजवर त्यांनी यमुनेचे पाणी प्यायले नाही. दिल्लीची जनता अस्वच्छ पाणी पिते, पण केजरीवाल कोट्यवधीच्या शीशमहालात बसून स्वच्छ पाणी पितात", अशी टीका राहुल गांधी यांनी केली.नरेंद्र मोदी म्हणाले, "आम आदमी पार्टी व अरविंद केजरीवालांनी केवळ हरियाणातील नव्हे तर संपूर्ण देशातील जनतेचा अपमान केला आहे. एखाद्याची चूकभूल माफ करणं ही आपली संस्कृती आहे. परंतु, कोणी जाणून बुजून चुका करत असेल, देशालाच अपमानित करत असेल तर देश त्याला कधीच माफ करत नाही. हरियाणाचे लोक देशभक्त आणि धार्मिक आहेत. केजरीवालांच्या वक्तव्याने हरियाणातील लोकांचा अपमान झाला आहे, त्याचबरोबर त्यांनी संपूर्ण देशातील जनतेचा अपमान केला आहे. हा आपल्या संस्कृतीचा अपमान आहे. केजरीवालांना अशी भाषा शोभत नाही. दिल्लीची जनता त्यांना येत्या निवडणुकीत चांगलाच धडा शिकवेल. त्यांचा अंहकार यमुनेच्या पण्यात बुडेल.

# दक्षिण सुदानमध्ये भीषण विमान अपघात

## 21 जणांपैकी फक्त एकजण वाचला; मृतांमध्ये भारतीयचाही समावेश

। प्रयागराज ।महाईन्यूज

**दक्षिण सुदानमध्ये एका विमानाला अपघात झाला आहे. या विमानात प्रवासी आणि क्रू मेंबर्ससह २१ लोक होते. या अपघातात २० जणांचा मृत्यू झाला असून, या मृतांमध्ये दोन चीनी आणि एका भारतीय नागरिकाचा समावेश आहे. अपघात झाला तेव्हा विमान युनिटी ऑइलफील्ड विमानतळावरून राजधानी जुबाकडे उड्डाण करत होते.**

युनिटी राज्याचे माहिती मंत्री गटवेच बिपल यांनी अपघाताच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. या विमानात ग्रेटर पायोनियर ऑपरेटिंग कंपनीशी संबंधित तेल क्षेत्रातील कर्मचारी होते. ही कंपनी चायना नॅशनल पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि नाईल पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने काम करते. मृतांमध्ये दोन चिनी नागरिक आणि एका भारतीय नागरिकांचा समावेश आहे. सुरुवातीला या अपघातात १८ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त होते परंतु नंतर आणखी दोन जखमी प्रवाशांचाही मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. त्यामुळे एकूण मृतांची संख्या २० झाली. मात्र, या अपघातातून एक जण बचावला. सोशल मीडियावर व्हायरल



होत असलेल्या छायाचित्रांमध्ये एक शेतात विमानाचे अवशेष पडलेले दिसत होते. हे विमान ग्रेटर पायोनियर ऑपरेटिंग कंपनी (GPOC) ने चार्टर्ड केले होते आणि ते लाईट एअर सर्व्हिसेस एव्हिएशन कंपनी द्वारे चालवले जात होते. दरम्यान या अपघाताचे कारण अद्याप कळलेले नाही. या अपघाताबाबत तेल समृद्ध असलेल्या युनिटी राज्याचे माहिती मंत्री गटवेच बिपाल यांनी माहिती दिली आहे.२०११ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून, दक्षिण सुदानला खराब वाहतूक पायाभूत सुविधांचा सामना करावा लागत आहे आणि विमान अपघात बहुतेकदा ओव्हरलोडिंग किंवा खराब हवामानामुळे होतात. गेल्या काही वर्षांत दक्षिण सुदानमध्ये अनेक विमान अपघात झाले आहेत. २०१८ मध्ये, जुबाहून यिरोलला जाणारे विमान कोसळले होते, ज्यामध्ये १९ जणांचा मृत्यू झाला होता.

### 20 जणांचा मृत्यू झाला


२०१५ मध्येही, जुबा विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच एक रशियन मालवाहू विमान कोसळले होते, ज्यामध्ये सुमारे १२ लोकांचा मृत्यू झाला होता.युनिटी राज्याचे माहिती मंत्री गटवेच बिपल यांनी अपघाताच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. या विमानात ग्रेटर पायोनियर ऑपरेटिंग कंपनीशी संबंधित तेल क्षेत्रातील कर्मचारी होते. ही कंपनी चायना नॅशनल पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि नाईल पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांच्या सहकार्याने काम करते.

# लक्ष्मी व सरस्वतीने शेअर केला व्हिडीओ



‘नवरी मिळे हिटलरला’या मालिकेतील सरस्वती व लक्ष्मी ही पात्रे घराघरात पोहोचली आहेत. दुर्गा, लक्ष्मी व सरस्वती या तिघी सतत लीलाला त्रास देण्यासाठी काही ना काही करताना दिसतात. लीला कधी कधी त्यांच्या बोलण्याला फसते. अनेकदा त्यांना सडेतोड उत्तरे देते. मालिकेतील त्यांचे नाते आंबट-गोड असले तरी पडद्यामागे मात्र हे कलाकार एकमेकांबरोबर मजा मस्ती करताना दिसतात. विविध व्हिडीओ व सोशल मीडियावरील विनोदी रील्स अशा माध्यमातून हे कलाकार प्रेक्षकांच्या भेटीला येताना दिसतात. आता मालिकेतील लक्ष्मी व सरस्वती यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे.‘नवरी मिळे हिटलरला’या मालिकेतील लक्ष्मी व सरस्वती यांनी सोशल मीडियावर एक विनोदी रील शेअर केली आहे. आमचे पती आमच्यावर प्रेम करत नाहीत, असे या रीलचा आशय आहे.हा व्हिडीओ सरस्वतीच्या भूमिकेत दिसणाऱ्या अभिनेत्री भूमिजा पाटीलने शेअर केली आहे. हा व्हिडीओ शेअर करताना तिने, “सरस्वती आणि लक्ष्मीचा नेहमीचा विषय”, अशी कॅप्शन दिली आहे. याबरोबरच लक्ष्मीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री सानिका काशिकर व नवरी मिळे हिटलरच्या इन्स्टाग्राम अकाउंटला टॅग केले आहे. आता अभिनेत्रींच्या या व्हिडीओवर अनेकांनी कमेंट केल्या आहेत. मात्र, या सगळ्यात नवरी मिळे हिटलरला मालिकेतील सहकलाकारांनीदेखील यावर मजेशीर कमेंट केल्या आहेत. रेवतीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री आलापीनीने कमेंट करीत लिहिले की लवकरच रेवती या गँगमध्ये येणार आहे. लक्ष्मीचा नवरा म्हणजे प्रमोदची भूमिका साकारणाऱ्या मिलिंद नंदाने लिहिले की आत्ता आठवतोय आम्ही? लीलाचा रोमान्स बघून ईर्ष्या वाटत होती ना? द्या अजून त्रास द्या लीलाला”, तर सरस्वतीचा पतीची म्हणजेच विराजची भूमिका साकारणाऱ्या राजदीपने कमेंट करीत लिहिले की, बरं आपल्या लेखकाला मी ही रील पाठवली आहे.

# कार्तिक आर्यनचा गौरव!



प्यार का पंचनामापासून कार्तिक आर्यनची झालेली सुरुवात आता त्याला यशाच्या शिखरावर घेऊन गेली आहे. तो एक तारांकित अभिनेता झाला आहे. त्याच्या शब्दाला वजन आले आहे. प्रख्यात सेलिब्रेटी झाला आहे. सोशल मीडियावर त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. त्याला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. अशा कार्तिकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. काही दिवसांपूर्वी कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी यांचा सत्य प्रेम की कथा नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. समीर विद्वंस दिग्दर्शित या चित्रपटानं चांगली कमाई केली आहे. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसादही मिळाला आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटानं शंभर कोटींपेक्षा जास्त कमाई केल्याची आकडेवारी समोर आली आहे. यानंतर येत्या काळात कार्तिकचे मोठे प्रोजेक्ट चाहत्यांचे लक्ष वेधून घेणार आहे.

# डोडी खान कोण आहे?



बॉलीवूडची ड्रामा क्वीन अर्थात राखी सावंत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. चर्चेचं कारण आहे तिचं लग्न. हो, हे खरं आहे. तिसऱ्यांदा राखी सावंत बोहल्यावर चढण्यासाठी तयार झाली आहे. पाकिस्तानच्या लोकप्रिय अभिनेत्याशी तिचं नाव जोडलं गेलं असून लग्नाच्या तयारीत असल्याचं समोर आलं आहे. पण , राखी सावंत तिसऱ्यांदा लग्न करत असलेला पाकिस्तानी अभिनेता कोण आहे? आणि ती तिसऱ्या लग्नाबाबत नेमकं काय म्हणाली लोकांचं सतत मनोरंजन करणारी राखी सावंत काही महिन्यांपूर्वी भारत सोडून दुबईला शिफ्ट झाली. त्यानंतर आता राखीने स्वतः तिसऱ्यांदा लग्न करणार असल्याचं जाहीर केलं आहे. यावेळेस राखी पाकिस्तानी अभिनेता डोडी खानबरोबर लग्न करणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. डोडी खान पाकिस्तानचा एक लोकप्रिय अभिनेता आणि मॉडेल आहे. त्यानं ‘दुर्ज’, ‘घबराना नहीं है’, ‘अखाडा’, ‘चौधरी’ यांसारख्या बऱ्याच लोकप्रिय चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

# सुनीता आहुजाने विचारलेले ‘हे’ प्रश्न

नव्वदच्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक अशी गोविंदा(GOVINDA)ची ओळख आहे. अभिनेत्याचे ‘कुली नंबर १’, ‘राजा बाबू’ सारखे चित्रपट आजही प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करतात. याबरोबरच, अभिनेता त्याच्या व्यक्तव्यामुळेदेखील बऱ्याचदा चर्चेत असतो. काही दिवसांपूर्वी अभिनेत्याला गोळी लागली होती. अपघाताने अभिनेत्याकडूनच पायाला गोळी लागली होती. त्यावेळी गोविंदाची पत्नी सुनिता आहुजा घरी नव्हती. आता त्यावेळी नेमके काय घडले होते, याबद्दल गोविंदाची पत्नी सुनीता आहुजाने एका मुलाखतीत वक्तव्य केले आहे. याबरोबरच, गोविंदाला गोळी लागल्यानंतर त्यांच्यात फोनवर काय संवाद झाला होता, यावरही सुनीता आहुजाने वक्तव्य केले आहे.हिंदुस्तान टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत म्हटले की मी कधीच कोणत्याच परिस्थितीत गोंधळून जात नाही. गोविंदाला ज्यावेळी गोळी लागली होती, त्यावेळची आठवण सांगत म्हटले, “मला माझ्या ड्रायव्हरने फोन केला आणि सांगितले की साहेबांना गोळी लागली. मी त्याला म्हटले की गोळी लागली की कोणी मारली? त्यानंतर त्याने सांगितले की बंदुक ठेवते होते. ती खाली पडली. त्यानंतर गोविंदाचे माझ्याशी बोलणे झाले. त्याने मला सांगितले की गोळी लागली. मी त्याला म्हटले की तू स्वतःच तर गोळी मारून घेतली नाहीस? त्यावर त्याने म्हटले की अजूनही तुला विनोद सुचत आहे? त्यानंतर मी त्याला शांत व्हायला सांगितले. मला भीती वाटत होती की त्याला हार्ट अटॅक येऊ शकतो. माझी मुलगी टीना घरी होती. मी तिला फोन करून गोंधळून जाऊ नकोस, असे सांगत तिला दवाखान्यात घेऊन जाण्यास सांगितले आहे.

# तमन्नाकडे सर्वात मोठा हिरा!



साऊथमध्ये आपल्या अभिनयाची छाप सोडल्यानंतर तमन्ना भाटियाने आता बॉलिवूडकडे तिचा मोर्चा वळवला. खुप कमी वेळात ती बॉलिवूडमधलं ही एक प्रसिद्ध नाव बनली आहे. गेल्या काही दिवसांपासून तमन्नाची खुपच चर्चा आहे तमन्ना तिच्या उत्तम अभिनयासोबतच सौंदर्य आणि वेगवेगळ्या भुमिकांसाठीही ओळखली जाते. तमन्नाची फॅशन आणि स्टाईल लोकांना खूप आकर्षित करते. यासोबतच तिला हिऱ्यांच्या दागिन्यांची खूप आवड आहे. तिच्याकडे सर्वात महागडे दागिने असून त्यात एक हिरा असा आहे जो जगातील पाचव्या क्रमांकाचा हिरा असल्याचं बोलल जात आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये दिलेल्या माहितीनुसार, तमन्ना भाटियाकडे जगातील पाचव्या क्रमांकाची डायमंड असलेली भली मोठी अंगठी आहे. ज्यामध्ये एक मोठा हिरा जडलेला आहे. या हिऱ्याची किंमत 2 कोटी रुपये असल्याचा दावा करण्यात आला आहे. या अंगठीतील हिऱ्याचा आकार अतिशय सुंदर आहे जो खुपच चमकदार आणि सुंदर कलाकृतीचा आहे. एका अहवालानुसार, तमन्नाला ही हिऱ्याची अंगठी 2019 मध्ये दक्षिण सुपरस्टार राम चरणची पत्नी उपासना कामिनेनी भेट दिली होती. तमन्नाच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रभावित होऊन उपासनाने तिला ही हिऱ्यांची अंगठी भेट दिली. उपासनाने तिच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तमन्ना भाटियाचा हिऱ्याची अंगठी असलेला फोटो शेअर केला आहे. त्या पोस्टमध्ये तमन्नाने धन्यवाद म्हटले आहे.

# प्रत्येक चेंडूवर बाऊंड्री मारु शकत नाही!

## माजी खेळाडूने भारताच्या पराभवाचे खापर हार्दिकवर फोडले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव हा खेळाच्या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये आक्रमक फलंदाजी करण्यात माहीर आहे. मात्र, गेल्या काही सामन्यांपासून त्याची बॅट शांत आहे. सूर्यकुमार यादवने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या तीन सामन्यांमध्ये धावा केल्या नाहीत. दरम्यान, इंग्लंडचा माजी कर्णधार मायकल वॉनने सूर्यकुमार यादवच्या अधिक आक्रमक वृत्तीवर टीका केली आहे. तिसऱ्या टी-२० सामन्यात सूर्यकुमार पॉवरप्लेमध्ये फ्लिक शॉट खेळण्याच्या प्रयत्नात बाद झाला.**



मायकल वॉनने म्हटले आहे की, सूर्यकुमार आवश्यकतेनुसार खेळत नाही आणि खूप आक्रमक खेळण्याच्या नादात विकेट गमावत आहे. भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव सध्या सुरू असलेल्या मालिकेत फार कमी वेळ क्रीझवर राहू शकला आहे. त्याने तीन सामन्यांमध्ये १७ चेंडूंचा सामना केला आणि केवळ २६ धावा केल्या आहे.मायकल वॉन क्रिकबझवर म्हणाला की, "जेव्हा तुम्ही नेहमी आक्रमक राहा असे म्हणता, याचा अर्थ योग्य चेंडू निवडून आक्रमक होणे असा होतो. तुम्ही प्रत्येक चेंडूवर बाऊंड्री मारु शकत नाही. भारत कोणत्या कारणासाठी जगज्जेता आहे, त्यासाठी त्यांना सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. खेळाडूंना चांगल्या फॉर्ममध्ये येण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मैदानावर वेळ घालवणे. सध्या सूर्यकुमार यादव मैदानावर काही चांगले फटके मारत आहे, पण डोळ्याची पापणी लवताच तो बाद होऊन माघारी परतत आहे. तो कोणतेही महत्त्वपूर्ण योगदान न देता माघारी जात आहे."इंग्लंडचा माजी खेळाडू म्हणाला, "जर मालिकेत अशी वेळ आली असेल जेव्हा सूर्याला आपली कामगिरी सुधारण्यासाठी पाचव्या गीअरवरून तिसऱ्या गीअरवर जावे लागले असेल, तर ती वेळ राजकोटमध्ये आली होते. ते २१० किंवा २२० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करत नव्हते. लक्ष्य योग्य होते. त्याला फक्त हुशारीने खेळायचे होते आणि ते साध्य करायचे होते."भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत यजमान संघाला तिसऱ्या सामन्यात २६ धावांनी धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. राजकोट येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताने प्रथम गोलंदाजी करत इंग्लंडला १७१/९ पर्यंत रोखले. प्रत्युत्तरात लक्ष्याचा पाठलाग करताना, भारताने नियमित अंतराने विकेट्स गमावल्या आणि ९ बाद १४५ धावाच करता आल्या. या सामन्यात भारताची संपूर्ण बॅटिंग लाईनअप सपशेल अपयशी ठरली. सामन्यानंतर पार्थिव पटेलने हार्दिक पंड्याच्या फलंदाजीवर टीका केली.हार्दिक पंड्याने लक्ष्याचा पाठलाग करताना ३५ चेंडूत ४० धावांची खेळी साकारली. भारताचा माजी यष्टीरक्षक पार्थिव पटेलने सामन्यानंतरच्या शोमध्ये हार्दिकच्या संथ सुरुवातीवर टीका केली. स्टार स्पोर्ट्सच्या मॅचनंतरच्या शोमध्ये पार्थिव म्हणाला, "टी-२० क्रिकेटमध्ये सेट होण्यासाठी २०-२५ चेंडू लागू नयेत. मी समजू शकतो की तुम्ही सेट होण्यासाठी वेळ घेत आहात. पण तुम्हाल स्ट्राईक रोटेट करत राहावे लागेल. हार्दिकने ३५ चेंडूत ४० धावा केल्या असतील, पण त्याच्या डावाच्या सुरुवातील बरेच डॉट बॉल खेळले. ज्यामुळे इतर फलंदाजावर दबाव वाढला."पार्थिवशिवाय केव्हिन पीटरसननेही ध्रुव जुरेलला आठव्या क्रमांकावर पाठवण्याच्या टीम इंडियाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले आहेत. पीटरसन म्हणाला, "भारताने फलंदाजीचा क्रम योग्य ठेवला नाही. ध्रुव जुरेल हा कुशल फलंदाज आहे. त्याला बॅटिंग ऑर्डरमध्ये खाली ठेवणे योग्य नव्हते. मला माहीत आहे की तुमचे सर्वोत्तम फलंदाज पुढे फलंदाजी करतात.

### वरुण चक्रवर्तीने केले प्रभावित

डावे आणि उजवे हाताचे फलंदाजाचे संयोजन चौथ्या क्रमांकापर्यंत ठीक आहे. पण त्यानंतर तुम्ही तुमचे सर्वोत्तम फलंदाज पाठवले पाहिजेत. जुरेल हा योग्य फलंदाज आहे. त्याला मोठी खेळी खेळता आली असती."या सामन्यात भारतासाठी फिरकीपटू वरुण चक्रवर्ती हा सकारात्मक पैलू होता. त्याने पाच विकेट्स घेतल्या, पण संघाला विजय मिळवता आला नाही. २०२१ मध्ये टीम इंडियातून बाहेर पडलेल्या या गोलंदाजाने जबरदस्त पुनरागमन केले आहे. गेल्या वर्षी तो संघात परतला आणि तेव्हापासून तो वर्चस्व गाजवत आहे. त्याने १० सामन्यात २७ विकेट्स घेतल्या आहेत. राजकोट टी-२० मध्ये वरुणने इंग्लंडचा कर्णधार जोस बटलर, जेमी स्मिथ, जेमी ओव्हरटन, ब्रेडन कार्स आणि जोफ्रा आर्चर यांना बाद केले होते.भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव सध्या सुरू असलेल्या मालिकेत फार कमी वेळ क्रीझवर राहू शकला आहे. त्याने तीन सामन्यांमध्ये १७ चेंडूंचा सामना केला आणि केवळ २६ धावा केल्या आहे.

# आक्रमक आणि बेफिकीर यात फरक आहे!

## परिस्थिती आणि गोलंदाजी समजून घ्यावी लागेल : आर अश्विन

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा माजी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने भारताविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळणाऱ्या इंग्लंड संघावर निशाणा साधला आहे. या मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात इंग्लंडचा संघ पराभूत झाला होता आणि तिसऱ्या सामन्यातही इंग्लंडने पराभवाचे नशीब स्वतःच लिहिले होते.**





भारताची फलंदाजी खराब झाली होती. अशा परिस्थितीत इंग्लंडने विजय मिळवला, पण आर अश्विनने सामन्याच्या मध्यावर इंग्लंड संघावर निशाणा साधला आणि आक्रमक आणि निष्काळजी क्रिकेटमध्ये थोडा फरक आहे, असा सल्ला दिला."आक्रमक क्रिकेट खेळणे आणि बेफिकीर क्रिकेट खेळणे यात खूप बारीक रेषा आहे," असे आर अश्विनने एक्सवर इंग्लंडच्या डावाच्या मध्यावर पोस्ट केली होती. अश्विनचा स्पष्ट अर्थ असा होता की, आक्रमक क्रिकेट खेळण्याऐवजी तुम्ही बेफिकीर क्रिकेट खेळत नाही, याकडे लक्ष द्या, कारण इंग्लंड संघाचा प्रत्येक फलंदाज फक्त मोठे फटके खेळण्याचा प्रयत्न करत होता. ते कोणत्याही गोलंदाजाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करत असले तरी, तुम्हाला सामन्याची परिस्थिती आणि गोलंदाजी समजून घ्यावी लागेल, तरच तुम्ही यशस्वी होऊ शकता. या टी-२० मालिकेत इंग्लंडचा संघ सतत तीच चूक करत होता. ते वरुण चक्रवर्तीच्या षटकात आक्रमक फलंदाजी करण्याच्या प्रयत्नात बाद होत होते. त्याने तीन सामन्यांत १० विकेट्स घेतल्या आहेत. हॅरी ब्रूकसारखा फलंदाज फिरकी गोलंदाजीवर आक्रमण करताना पुन्हा पुन्हा आऊट होत आहे.

### ओव्हर्टनने 3 विकेट्स घेतल्या

मात्र, राजकोटमध्ये इंग्लंडने विजय मिळवत मालिकेत स्वतःला जिवंत ठेवले. चौथा सामना ३१ जानेवारीला पुण्यात होणार आहे. सामन्याबद्दल बोलायचे तर, इंग्लंड संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ९ गडी गमावून १७१ धावा केल्या होत्या, भारतीय संघ१७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ९ बाद १४५ धावाच करु शकला. ज्यामुळे भारताला २६ धावांनी पराभव पत्करावा लागला. भारतासाठी हार्दिक पंड्याने सर्वाधिक ४० धावांचे योगदान दिले. इंग्लंडसाठी जेमी ओव्हर्टनने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.

# चऱ्होलीमधील मुलांची नॅशनल कराटे चॅम्पियनशिपमध्ये नेत्रदीपक कामगिरी!

## क्रीडा विश्व: पद्मश्री मुरलीकांत पेटकर नॅशनल कराटे चॅम्पियनशिप 2025

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**शिवछत्रपती स्टेडियम बालेवाडी येथे पद्मश्री मुरलीकांत पेटकर नॅशनल कराटे चॅम्पियनशिप 2025 मध्ये चऱ्होलीमधील मुलांनी नेत्रदीपक कामगिरी केली. या स्पर्धेमधून विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक पटकावले.**

बालेवाडी येथे या स्पर्धा 25 आणि 26 जानेवारी 2025 रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेचे आयोजन किसनराव तापकीर सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्टच्या वतीने अॅड.कुणाल किसनराव तापकीर यांच्या वतीने सुरू करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये सात वर्षे वयोगटामध्ये कुशल उमेश पवार कराटे फाईट याने सुवर्णपदक पटकावले. नऊ वर्ष वयोगटात वेद ज्ञानदेव शितोळे याने रौप्य पदक तर स्वराज संतोष होंगुले याने कांस्यपदक पटकावले. अकरा वर्षे वयोगटात ललित सचिन पाटील याने रौप्य पदकाची कमाई केली. बारा वर्षे वयोगटात सोहम बालाजी जाधव याने कांस्य पदक मिळविले. अबूबकर इनामदार याने कांस्यपदक पटकावले.

चौदा वर्षे वयोगटात सेजल दत्तात्रय काळे हिला कांस्यपदक तर अक्षद निलेश लळे याने पंधरा वर्षे वयोगटात कांस्यपदक पटकावले. सोळा वर्षे वयोगटात प्रियंका किशोर ढाळे सुवर्णपदका सहित रौप्य पदकाची देखील कमाई केली. वेदिका विश्वनाथ रसाळने रौप्य पदक व पदक, 19 वर्षे वयोगटात अश्विनी चंद्रशेखर भोकरे हीने रौप्य पदक व.कांस्य पदक मिळविले. नेहा गावडे, समर्थ तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थी प्रशिक्षण देण्यात आले होते.



> किसनराव तापकीर सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट संचलित शिवाई माझी सुरक्षित बहीण योजना या प्रशिक्षणांतर्गत सर्व मुलांना मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण देण्यात येते. यातून विद्यार्थी शारीरिक दृष्ट्या सक्षम होत आहेत.
>
> – **अॅड कुणाल किसन महाराज तापकीर,** चऱ्होली.






# गायत्रीच्या विद्यार्थ्यांनी लुटला शैक्षणिक सहलीचा आनंद!

## शिक्षण विश्व : जीपलाईन आणि क्लाइमिंग'च्या साहसी खेळांना विद्यार्थ्यांची पसंती

**। पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**साहसी खेळांबरोबरच मनोरंजन पर कार्यक्रमांचा आस्वाद घेत गायत्री विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीचा आनंद लुटला.**

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या मोशी व चऱ्होली शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचे खेड शिवापूर येथील 'रॉकस्पोर्ट्स एडवेंचर पार्क' येथे आयोजित करण्यात आले होते. या सहलीचे आयोजन संस्थाध्यक्ष विनायकराव भोंगाळे ,व्यवस्थापकीय संचालिका कविता कदू पाटील, विश्वस्त सरिता विखे पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या शैक्षणिक सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी पार्क मधील विविध खेळांचा आनंद लुटत आपल्यामधील साहसांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. त्यामध्ये जीपलाईन आणि क्लाइमिंग सारख्या साहसी खेळांना विद्यार्थ्यांनी विशेष पसंती दिली. विशेष म्हणजे या पार्कमध्ये चिमुकल्यांसाठी साहसी खेळांबरोबरच मनोरंजन पर कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते.

आपापल्या वर्गशिक्षकांबरोबर हसत खेळत सर्व विद्यार्थ्यांनी या सहलीचा मनमुराद आनंद लुटला. जाताना येताना प्रवासादरम्यान गप्पागोष्टी गाणी गात, हसत नाचत हर्षोल्लासात सहल संपन्न झाली. त्यासाठी संस्थेच्या दोन्हीही शाखेचे उपप्राचार्य,प्राचार्य यांनी अनमोल मार्गदर्शन केले. तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य मोलाचे ठरले.

> सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामूहिक जीवनाची गोडी वाढते. विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्तप्रियता, सहकार्याची वृत्ती, स्वावलंबन, नेतृत्वगुण, सामाजिक जाणिवांचे संवर्धन असे गुण सहलींमधून जोपासले जातात. समाजात कसे वावरावे, चारचौघांत मिळून-मिसळून कसे वागावे, ह्याचे धडे सहलींच्या अनुभवातून प्रत्यक्षपणे मिळतात. त्यामुळे या सहलीचे नियोजन करण्यात आले.
>
> – **कविता कदू पाटील,** व्यवस्थापकीय संचालिका.




DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191

# पिंपरी चिंचवड पॉलीटेक्निकची कामगिरी

## क्रिडा विश्व : पुण्यात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत मुला-मुलींचा संघ विजयी




। पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन, डी.१ झोन च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या टेबल टेनिस स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड पॉलीटेक्निक मधील मुले आणि मुलींच्या संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.**

झील पॉलिटेक्निक, पुणे येथे झालेल्या मुले व मुलींच्या टेबल टेनिस स्पर्धेत विजेत्या संघांना प्रो. निलेश कोकरे, प्राचार्य आयुब तांबोळी, समन्वयक प्रा. अमोल चांदारे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. द्वितीय क्रमांक मुले, मुलींच्या स्पर्धेमध्ये झील पॉलिटेक्निक संघाने मिळवला.

यशस्वी विद्यार्थी व संघ व्यवस्थापक प्रा. शिंदे जयश्री, मयुरी देशमुख, डॉ. एम. एस. पवार, संजय शिरोडे, क्रीडा समन्वयक सुनिल जगताप, प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.या शैक्षणिक सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी पार्क मधील विविध खेळांचा आनंद लुटत आपल्यामधील साहसांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. त्यामध्ये जीपलाईन आणि क्लाइमिंग सारख्या साहसी खेळांना विद्यार्थ्यांनी विशेष पसंती दिली.

विशेष म्हणजे या पार्कमध्ये चिमुकल्यांसाठी साहसी खेळांबरोबरच मनोरंजन पर कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते.

आपापल्या वर्गशिक्षकांबरोबर हसत खेळत सर्व विद्यार्थ्यांनी या सहलीचा मनमुराद आनंद लुटला. जाताना येताना प्रवासादरम्यान गप्पागोष्टी गाणी गात, हसत नाचत हर्षोल्लासात सहल संपन्न झाली. त्यासाठी संस्थेच्या दोन्हीही शाखेचे उपप्राचार्य,प्राचार्य यांनी अनमोल मार्गदर्शन केले.

तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य मोलाचे ठरले.

## रस्ता सुरक्षा अंतर्गत भोसे येथील शाळेत जनजागृती; सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमोल नागणे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन!

। पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे, पिंपरी चिंचवड यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा, भोसे (ता.खेड) येथे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये रस्ता सुरक्षा विषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**

प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, सहाय्यक प्रादेशिक सुरेश आव्हाड व पवन नवाडे, मोटार वाहन निरीक्षक निनाद सुर्वे आदी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमोल नागणे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जनजागृती कार्यक्रमात बोलताना सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमोल नागणे उपस्थित पालक, विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, रहदारीचे नियम जीवनाच्या सुरक्षिततेसाठी असतात. त्याकडे नियम म्हणून न पाहता कर्तव्य म्हणून पहावे. आजचा विद्यार्थी उद्याचा चालक असल्याने त्यांच्यात जागृती झाल्यास भविष्यात अपघातांना आळा बसू शकतो.शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत असताना एक जबाबदार नागरिक बनावे. रस्त्यावर एखादा अपघात घडल्यास तात्काळ अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे, वाहन चालवतांना हेल्मेट, सीट बेल्टचा वापर करावा. मद्यपान करून वाहन न चालवणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर न करणे, अति वेगाने वाहन न चालवणे अशा वाहतूक नियमांविषयी मार्गदर्शन केले. तसेच रुग्णवाहिका संपर्क १०८, वाहतूक नियम यांचे उल्लंघन केल्यावर करण्यात येणारी कारवाई याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

